*Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha's*

**C.K.THAKURtfIDYALAYA,NEWPANtfEL**

**ENGLISHMEDIUM-SECONDARYSECTION**

**Plot: 8, Sector: 14, Janardan Bhagat Marg CIDCO Colony, New Panvel, TN: 27463729, E-mail: ckteshm@gmail.com**

School Code / Index: (1) HSE & NTSE: **1403039**; (2) U-DISE: **27240818843**; (3) SSC: **17.01.017**

Date: 14/07/2025

# ‘‘सी.के.टी विद्यालयात गुरूपौर्णिमा उत्साहात’’

सी. के ठाकूर विद्यालय इंग्रजी माध्यम माध्यमिक विभागात आज दि. १४ जुलै २०२५ गुरूपौर्णिमा उत्सव नुकताच मोठ्या उत्साहात साजरा झाला. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक मा. श्री. संतोष चव्हाण सर व शाळेच्या पर्यवेक्षिका निरजा मॅडम, शिक्षक पालक संघाच्या सदस्या सौ. ज्योती शेवाळे, शिक्षक पालक संघाच्या सह सचिव स्नेहल सूर्यवंशी, इंग्रजी प्राथमिकच्या मुख्याध्यापिका सौ. निलिमा शिंदे मॅडम व इंग्रजी पूर्व प्राथमिकच्या पर्यवेक्षिका सौ. वैशाली पारधी मॅडम हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरूवात सरस्वती आणि गुरू व्यास यांच्या प्रतिमापूजनाने झाली. यानंतर शालेय गायक वृंदाने सुरेल प्रार्थना व स्वागतगीत सादर केले. विद्यालयातील संगीत शिक्षक श्री. रूपेश सर व त्यांच्या विद्यार्थी गायक वृंदांनी सुरेल गीत सादर केले.

इंग्रजी माध्यमिक विभागाच्या पर्यवेक्षिका सौ. निरजा अदुरी मॅडम यांनी कार्यक्रमाच्या प्रस्तावनेत गुरू चे महत्व सांगत विद्यार्थ्यांना गुरूपौर्णिमेच्या शुभेच्छा दिल्या.

गुरूपौर्णिमे निमित्त विद्यालयात कथाकथन स्पर्धा तसेच भाषण स्पर्धा घेण्यात आल्या होत्या त्यातील यशस्वी विद्यार्थ्यांचे सादरीकरण यावेळी झाले. गणित मॅरेथॉन परीक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यांना बक्षिस वितरण करण्यात आले. इ. ८वी तील विद्यार्थी कु. साईराज पाटील आणि निधि जगदिश पाटील यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. इयत्ता १० वी तील विद्यार्थीनी आपल्या गुरूंना अप्रतिम नृत्यातून गुरूवंदना अर्पण केली. विद्यालयातील शिक्षिका सौ. केशरी भोईर यांनी गुरूंचे महत्व आपल्या भाषणातून सांगितले.

शाळेचे मुख्याध्यापकांनी आपल्या भाषणातून विद्यार्थ्यांना यशस्वी होण्यासाठी आपल्या जीवनात गुरूंचे महत्व प्रतिपादीत केले. आणि विद्यार्थ्यांना कायम आपल्या गुरूंचे ऋणी राहिले पाहिजे हे सांगितले.